<u>**वादी तर्फे साक्षीदार क्र. १ - प्रशांत विनायकराव झाडे.**</u>

**उलटतपास प्रतिवादी क्र.२ साठी विधीज्ञ श्री. एम. आर. धांडे यांच्या मार्फत शपथेवर पुन्हा सुरु.**

४. दि.१७.०७.२०१० रोजी प्रस्तुतचा दावा दाखल करण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, करारनाम्यामधे मोजणी झाल्यांनतर खरेदी खत करण्यात येईल असे नमुद केलेले नाही. सन २००८ या वर्षात मी जिम चालवित होतो. त्यावेळी मी जिम मधुन वार्षिक चार लाख रुपये उत्पन्न मिळवत होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्या रकमेतुनच जिमचा मेन्टेनन्स व नोकरांचे पगार करावे लागत होते. जिम माझ्या स्वतःच्या जागेत होती. हा दावा दाखल करण्यापुर्वी मी प्रतिवादी क्र.१ यांना नोटीस पाठविलेला नव्हता. दि.१८.०७.२०१० रोजी प्रतिवादी आले नाहीत व खरेदी खत करुन दिले नाही, अशा आशयाचे शपथपत्र दुय्यम निबंधक कार्यालयाच्या अनुषंगाने मी केलेले नाही. दि.२४.०७.२००८ रोजी मी आठ लाख रुपये रक्कम कोठुन आणली, हे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा मी प्रकरणात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझेत व प्रतिवादी क्र.१ मधे कुठलाही करारनामा झाला नव्हता व मी त्याला आठ लाख रुपये रक्कम दिली नव्हती.

प्रश्न - सन २००८ साली आठ लाख रुपये दिल्यानंतर सन २०१० पर्यंत विक्रीपत्रासाठी वाट पाहण्याचे कारण काय ?

उत्तर - कागदपत्रांच्या पुर्ततेसाठी वाट पाहण्यात आली होती.

५. कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतर विक्रीपत्र करण्यात येईल, असे करारनाम्यात नमुद नाही. जिमच्या उत्पन्नातुन वार्षिक चार लाख रुपये कमावत होतो असा दर्शविणारा

कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही.

६. हे म्हणणे खरे नाही की, मी, प्रतिवादी क्र.१ व इतर आठ लोकांविरुद्ध अपहरणाची केस दाखल झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या केसमधे फसलो होतो व त्याचा बदला घेण्यासाठी मी प्रतिवादी क्र.१ कडुन बळजबरीने करारनामा लिहुन घेतला. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा करारनामा खोटा आहे. उमरेड येथील टिचर्स कॉलनी या परिसरात मी सन २००८ मधे राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की, करारनाम्यावरील दोन्ही साक्षीदार हे माझे खुप चांगले मित्र आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ यांनी माझे हक्कात कोणताही करारनामा करुन दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र.१ याला आठ लाख रुपये रक्कम दिलेली नाही. गिरड रोडच्या डाव्या दिशेला वाद प्लॉट आहे. गिरड रोडच्या उजव्या दिशेला मी तेव्हा राहत होतो. भाउ साहेब मोडक जलतरण तलाव हा नगर परिषदेचा आहे व तो चालविण्याचा ठेका सन २००८ मधे माझ्याकडे होता. हे म्हणणे खरे नाही की, सन २००८ मधे परसोडी व मौजा बेलगाव येथे फार वस्ती नव्हती. दावा प्लॉट हा उमरेड नगर परिषदेच्या हद्दीत येत होता की नाही याची मी शहानिशा केली नव्हती. घरुन निघाल्यानंतर जलतरण तलावाकडे जातांना वाद प्लॉट रस्त्यास लागुन असल्यामुळे सहज दिसत होता. तो कॉर्नरचा प्लॉट आहे. जलतरण तलावाचा ठेका माझ्याकडे जोपर्यंत होता तोपर्यंत तो माझा रोजचा जाण्या येण्याचा रस्ता होता. मी जलतरण तलावाकडे दिवसातुन चार वेळेस जायचो. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्लॉटच्या पश्चिमेस व दक्षिणेस रस्ता आहे. त्या प्लॉटवर बांधकामाचे साहित्य पडलेले असेल किंवा त्यावर बांधकामासाठी घडामोड होत असेल तर मला सहज दिसले असते.

७. माझा सामाजिक क्षेत्रात प्रभाव होता व आहे. मी नगर परिषदेची हल्लीची निवडणुक लढलेलो आहे. सामाजिक क्षेत्र व क्रिडा क्षेत्रात माझा दांडगा अनुभव आहे. राजकीय

क्षेत्रात मी नुकताच आलेलो आहे. जलतरण तलावाचा ठेका नगर परिषदेमार्फत पेपरमधे बातमी दिल्यानंतर दिल्या जातो. जलतरण ठेक्या संदर्भातील पेपरमधील बातमी मी वाचली नव्हती. दि.०८.१०.२००८ रोजीच्या दैनीक लोकसत्ता नागपुर या पेपरमधे प्रतिवादी क्र.२ यांचे दिर यांनी सदर प्लॉट विकत घेण्याबाबतच्या व्यवहाराची नोटीस छापली होती, याबाबत मला काही माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर जाहीरात मी वाचली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर जाहीरात वाचली होती परंतु माझे व प्रतिवादी क्र.१ मधे कसलाही करारनामा झाला नव्हता म्हणुन मी आक्षेप घेतला नव्हता. हे मला माहीत नाही की, कुठलाही आक्षेप आला नव्हता व त्यामुळे दि.०८.१२.२००८ रोजी प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.१ यांच्याकडुन या प्लॉटचे विक्रीपत्र करुन घेतले. दि.०८.०९.२००९ रोजी नगर परिषदेने प्रतिवादी क्र.२ यांना सदर प्लॉटवर बांधकाम करण्यासाठी नकाशा मंजुर केला होता, याबाबत मला माहीत नाही. साक्षीदार सांगतात की, केला असेल.

८. हे मला माहीत नाही की, प्रतिवादी क्र.२ यांनी सदर प्लॉटवर एस.बी.आय. शाखा उमरेड यांचेकडुन कर्ज घेतलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.२०.०७.२०१० रोजीच्या पुर्वी प्रतिवादी क्र.२ यांनी सदर प्लॉटवर घराचे बांधकाम पुर्ण केले होते. हे मला माहीत होते की, प्रतिवादी क्र.२ हे सदर प्लॉटवर घराचे बांधकाम करत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सन २००९ ते २०१० या कालावधीत ते बांधकाम थांबविण्यासाठी मी नगर परिषदेकडे कुठलीही कारवाई केली नाही. अशा कारवाईचा किंवा तक्रारीचा उल्लेख दाव्यात व शपथपत्रात नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी तशी कुठलीही तक्रार केली नव्हती म्हणुन त्याचा दाव्यातील शपथपत्रात उल्लेख नाही. मी तशी तक्रार सन २००८ मधे केली होती परंतु तारीख व महीना सांगता येणार नाही. त्याची प्रत प्रकरणात दाखल नाही. याबाबत मला माहीती नाही की, प्रतिवादी क्र.२ यांनी दि.२०.०७.२०१० रोजी बांधकाम पुर्ण केल्याबाबत ठाकरे

असोसिएट्स यांनी एस.बी.आय. बँकेस प्रमाणपत्र दिलेले आहे. हे मला माहीत नाही की, सन २००८ च्या खरेदी खतानुसार सन २००९ मधे प्रतिवादी क्र.२ चे नाव सदर मिळकतीचे रेकॉर्डला लागलेले आहे. हे मला माहीत नाही की, दि.०३.०६.२००९ रोजी प्रतिवादी क्र.२ यांच्या नावाची नोंद सदर मिळकतीच्या नगर परिषदेच्या रेकॉर्डला झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१० साली सदर प्लॉटवर बांधकाम पुर्ण झाले होते. सन २००९ साली त्या प्लॉटवर बांधकामाची सुरुवात झाली होती हे मला माहीत आहे. प्रतिवादी क्र.२ या प्लॉटवर कोणत्या अधिकाराने बांधकाम करत आहे याबाबत मी पोलीस स्टेशनला तक्रार केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझा व प्रतिवादी क्र.१ यांचा कुठलाही व्यवहार झाला नव्हता, करारनामा झाला नव्हता व त्यामुळे मी तक्रारी केल्या नव्हत्या. हे मला सांगता येणार नाही की, प्रतिवादी क्र.२ यांचे सदर प्लॉटवरील बांधकाम पुर्ण झाल्यांनतर मी हा दावा दाखल केला.

९. हे म्हणणे खरे नाही की, दि.०१.०७.२०१० रोजी मी प्रतिवादी क्र.१ ची भेट घेतली नव्हती व विक्री पत्र करुन देण्याची विनंती केली नव्हती. बांधकामास मनाई हुकूम देण्यात यावा अशी मागणी या दाव्यात केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा सदर प्लॉटबाबत कुठलाही हक्क संबंध नाही व त्यामुळे मी तशी मागणी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२ यांनी रितसर परवानगी घेवुन बांधकाम पुर्ण केले आहे, ही बाब मी न्यायालयापासुन लपवुन ठेवली व हुकूमनामा प्राप्त करण्याचा प्रयत्न करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.०८.१२.२००८ रोजीच्या खरेदी खतान्वये प्रतिवादी क्र.२ ही सदर प्लॉटची मालक व ताबेदार आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २००८ मधे मी आठ लाख रुपये देण्याएवढा आर्थिक दृष्टया सक्षम नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२ यांना विनाकारण या दाव्यात गोवले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा करण्यास कुठलेही कारण उद्भवले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२ विरुद्ध दाद मागण्याचा अधिकार मला

नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर वाद प्लॉटस बाबत माझा कुठलाही अधिकार नाही व त्यामुळे बांधकाम काढुन टाकण्यासाठी मी कुठलीही मागणी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे व आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

समक्ष,

(एस. जी. लांडगे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
उमरेड
दि. ०३.०२.२०२६

श्रवणोत्तर स्विकृती,

(एस. जी. लांडगे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
उमरेड